**नियमित फौजदारी खटला क्र.१६१/२०२३**
**निशाणी क्र.८४/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ९ ची जबानी</u>**

माझे नांव - कृष्णात बळवंत पाटील ब नं. २४४९
वय वर्षे - ४७
सध्या - शाहूपूरी पोलीस स्टेशन कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारी वकील श्री.व्ही.पी.कुसुरकर यांच्यातर्फे -</u>**

१. सन २०२३ रोजी मी वडगांव पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होतो. वडगांव गुन्हा रजि.नं. ९६/२०२३ नुसार कमाल पटवगार यांनी पेन ड्राईव्ह जमा केला होता. त्या पेन ड्राईव्हची मी हॅश व्हॅल्यू काढून दिली होती. हॅश व्हॅल्यू काढत असताना तेथे उदयसिंह भोपळे व सतिश धनवडे पंच म्हणून हजर होते. KDM 32 gb चा स्टील Pen drive होता. तो Pen drive मी laptop ला लावून SHA 256 Hashcalc हे Software वापरून मी Hash value काढली होती. तो Pen drive व्हॅश व्हॅल्यू मिळाल्यानंतर काढून घेतला व एका कागदी लिफाफामध्ये घालून तपासी अधिकारी यांचेकडे दिले होते. त्यावेळेस तपासी अधिकारीनी माझ्या समोर त्या लिफाफाला लाखेचे सील लावले होते.

२. आता मला तो लिफाफा दाखविण्यात आला. तो तोच लिफाफा आहे. त्यास **नि.८५** देण्यात येते. आता मला नि.७८ वर दाखल असलेला Pen drive दाखविण्यात आला. तो तोच पेन ड्राईव्ह आहे. जो कमाल पटवेगारनी मला दिला होता. आता मला दि.०४/०३/२०२३ रोजीचा प्रमाणपत्र दाखविण्यात आलेले आहे. तो प्रमाणपत्र मीच दिलेला आहे. त्यावर पंचाची सही आहे. तो प्रमाणपत्र त्याच्या समक्ष केला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. प्रमाणपत्रामधील Hash value नमूद आहे तो तोच Hash value मी Software वरुन काढली आहे. त्यास **नि.८६** देण्यात येत आहे. Pen drive मध्ये एकच फाईल होती.

सरतपास संपला.

आरोपीच्या तोंडी विनंतीनूसार उलटतपास काही वेळापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री.दिपक पाटील वकील यांचेतर्फे</u>**

३. मी पेन ड्राईव्हमधील फाईल उघडून पाहील्या नसल्यामुळे ती ऑडीओ होती, व्हीडीओ होती किवाकसे हे मला माहीत नाही. Pen drive मधील फाईल कधीही create केली याची मी

खातरजमा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, File वर right click केल्यावर त्यामध्ये file create कधी झाले याची माहीती मिळते. हे म्हणणे खरे आहे की, Pen drive मधील file रेकॉर्डनुसार created ची तारीख २६/०२/२०२३ व File Modified ची तारीख १९/०२/२०२३.

४. Hash Value काढण्याकरीता कोणत्या Algorithm वापरलेले जातात हे मी सांगू शकत नाही. मला Algorithm विषयी तांत्रीकी माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जर file चे contents, extension बदलले तर फाईलचे hash value बदलते. हे म्हणणे खरे आहे की, जर फाईल copy करुन edit केली तर तरीही त्याचे hash value बदलते. हे म्हणणे खरे आहे की, जर फाईल edit करुन त्याचे छोटे MB चे फाईल बनवले तरीही त्याची hash value बदलते.

५. हे म्हणणे खरे नाही की, original file चे traveling path व त्यामधून तयार केलेल्या छोटया फाईल्स् चे traveling path हे compare करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या फाईलचा जर आपण SHA 256 वापरुन hash value काढले तर त्याचा रिपोर्ट generate होतो व त्याची Print काढू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, SHA 256 वापरून generate केलेला hash value रिपोर्ट सदर कामामध्ये हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा hash value रिपोर्ट तपासी अंमलदार यांना तपास कामी देण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, Certificate मधील hash value व hash value report मधील hash value हे दोन वेगवेगळे आहेत.

६. हे म्हणणे खरे आहे की, भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी नुसार चे certificate का दिले जाते यांचे ज्ञान मला आहे. कलम ६५ बी नूसार दिलेल्या प्रमाणपत्रात दोन्ही software व hardware माहीती सर्टीफाईड केली जाते. सदर प्रकरणात दाखल केलेले ६५ बी प्रमाणपत्रामध्ये मी hash value बाबत चे software मी सर्टीफाईड केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, hash value काढण्याकरीता वेगवेळगळया प्रकारचे hardware व software वापरले जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे hash value generate करण्यास वापरलेल्या hardware बाबत सदरच्या प्रमाणपत्रात उल्लेख नाही.

७. मी फाईलची size सांगू शकत नाही.

प्रश्न - प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या pen drive मधील file ची size किती आहे. ?

उत्तर - प्रमाणपत्रामध्ये नमूद size खाली 32 GB हे pen drive बाबत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रमाणपत्रामध्ये मी size खाली file ची Gb मध्ये नमूद size टाकले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेल्या pen drive मधील file ची size 17.6 MB ची आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रमाणपत्रामध्ये नमूद फाईलची साईज 32 GB असे आहे. साक्षीदार स्वतहून सांगतो की, प्रमाणपत्रामध्ये फाईलची साईज नसून ती pen drive ची साईज आहे. हे म्हणणे खरे आहे की, pen drive ची सविस्तर माहीती प्रमाणपत्रामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, फुटेज ची एक फाईल जी स्वत:कडे प्रमाणपत्रानूसार जतन केलेली आहे ती आज मी कोर्टात घेऊन आलेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्वतकडू जतन केलेली फाईल व कोर्टामध्ये दाखल केलेली फाईल ही एकच आहे हे compare केल्याशिवाय सागू शकत नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे hash value चा रिपोर्ट नसल्यामुळे त्याचे traveling path, editing, external text व malwares झाले आहे किवा कसे सांगता येणार नाही. मला hash value report न पाहता traveling path सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, hash value report न पाहता मला त्यामधील contents सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, hash value रिपोर्टमध्ये traveling path, editing, external text व malwares नमूद असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी ओरिजनल चे व्हीडीओ फाईल पाहीलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, pen drive मधील file ही मुळ रिकॉर्ड नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी pen drive व लखोट्यावर सही नाही.

८. पोलीसांनी सदर कामामध्ये जबाब घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना pen drive कागदी लखोट्यामध्ये घालून ते तपासी अधिकारी यांच्याकडे दिले व त्यावर त्यांनी लाखेचे सील लावले हे मी पोलीसांनी चौकशी दरम्यान सांगीतले नाही किंवा सर्टीफिकेट मध्ये नमूद नाही. साक्षीदार स्वतहून सांगतो की, त्यांनी स्वतहून पाहीले आहे की, लखोटा दिल्यावर तो लाखेच्या सीलने सील केला होता. साक्षीदार स्वतहून सांगतो की, पोलीसांनी त्याच्याकडे चौकशी केली नव्हती.

९. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणामध्ये काढलेलया hash value ची नोंद माझ्या personal diary मध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी hash value काढून पोलीसांना दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला असलेल्या तात्रीक शिक्षणाचे सर्टीफिकेट मी ठाणे अंमलदारला दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी

वरीष्ठाच्या सांगण्यावरुन सदर प्रकरणामध्ये प्रमाणपत्रावर सही करुन दिलेली आहे व मला कोणतेही तांत्रीक ज्ञान नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पेन डाईव्ह तपासा अंमलदारकडे दिले व त्यांनी ते सील केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी माझ्या वरीष्ठाच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृती

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. २२/०४/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव